राज्याचा कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यासाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीला सन २०१२-१३ साठी रु.१०२८.७५ लाख एवढा निधी मंजूर करणेबाबत करण्याबाबत..

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र.कौविका-२०१२/(४७/२०१२)/व्यशि-५
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ०८ जून, २०१२.

पहा:- १. मा.मुख्य सचिव महोदय यांच्या अध्यक्षतेखाली कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत Core Group च्या दिनांक १२/०३/२०१२ रोजी झालेल्या आढावाबैठकीचे इतिवृत्त.
२. आयुक्त, रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास यांचे पत्र क्र.१८ अ/कौविका/ २०१२/प्र.क्र.२७, दिनांक १३/०४/२०१२.

**प्रस्तावना-** मा.पंतप्रधानाच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय स्तरावरील कौशल्य विकासासंदर्भातील धोरण निश्चित करण्यासाठी राष्ट्रीय कौशल्य विकास परिषदेची (Prime Minister's National Council on Skill Development) स्थापना करण्यांत आली आहे. कौशल्य विकास कार्यक्रम ही मा.पंतप्रधानांची अतिशय महत्वाकांक्षी योजना (Flagship Scheme) असून राष्ट्रीय कौशल्य विकास परिषदेने ५० कोटी कुशल मनुष्यबळाची निर्मिती सन २०२२ पर्यंत करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यानुसार राज्यस्तरावर सन २०२२ पर्यंत ४.५ कोटी कुशल मनुष्यबळ निर्मितीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. मा.मुख्य सचिव महोदयांनी निश्चित केलेल्या KRA मध्ये कौशल्य विकास कार्यक्रमास अग्रस्थान देण्यात आले आहे.

२. या योजनेच्या नियोजनासंबंधीची कार्यवाही व प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता राज्यस्तरावरील नोडल एजन्सी म्हणुन सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० अंतर्गत महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीची स्थापना करण्यांत आलेली आहे. महाराष्ट्र राज्याच्या कौशल्य विकास कार्यक्रमास दिशा व गती देण्यासाठी राज्यस्तरीय Nodal Agency म्हणून स्थापन करण्यांत आलेल्या महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीच्या पुर्नरचनेबाबत दिनांक १२/०३/२०१२ रोजी झालेल्या कोअर ग्रुप च्या बैठकीत ठरले आहे

३. कौशल्य विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने मा. मुख्य सचिव, महोदयांकडे दिनांक १२/०३/२०१२ रोजी झालेल्या बैठकीत ठरल्यानुसार महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी या संस्थेच्या व्यवसायाभिमुख दृष्टीकोनातुन बळकटीकरण करण्यासाठी खालील प्रमाणे कार्यवाही करावयाची आहे.

अ) सदर संस्थेच्या कार्यालयासाठी मुंबई शहरातील प्रमुख ठिकाणी योग्य जागा निवडुन तेथे महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी या संस्थेच्या कार्यालयाची स्थापना करण्यांत यावी.

आ) या संस्थेचे कामकाज व्यवसायाभिमुख व प्रकल्प व्यवस्थापन योग्य पध्दतीने होण्याच्या दृष्टीने कंत्राटी पध्दतीने योग्य तांत्रिक सल्लागाराची नियुक्ती करण्यांत यावी.

इ) राज्यशासनाचे वेगवेगळे विभाग व जिल्हा समितीशी समन्वय साधणे, तसेच वेगवेगळ्या Sector चे नोडल ऑफिसर म्हणुन किमान ६ ते ८ Skill Mission Officer व एक Mission Coordinator ची नियुक्ती कंत्राटी पध्दतीने करण्यांत यावी.

ई) तीन महिन्यात देशातील व देशाबाहेरील सर्वोत्कृष्ट कार्यपध्दतीच्या अभ्यासासाठी विभागांचे सचिव व जिल्हयांचे जिल्हाधिकारी यांचे अभ्यासगट तयार करुन अभ्यास दौरे आयोजित करण्यांत यावेत.

उ) राज्यस्तरीय Skill Gap Assessment Study व Skill Development Plan तयार करण्यासाठी योग्य सर्वेक्षण संस्थेची निवड करुन ९० दिवसांत कार्यवाही पुर्ण करण्यात यावी.

ऊ) मुंबई, पुणे येथे कौशल्य विकास कार्यक्रमासाठी महाराष्ट्र शासन व्यवस्थापन केंद्राची स्थापना करण्याच्या दृष्टीने ९० [illegible] कार्यवाही [illegible]

४. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी सन २०१२-१३ आर्थिक वर्षात रु.१०२८.७५ लाख इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. यानुसार राज्याचा कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यासाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीला सन २०१२-१३ साठी रु.१०२८.७५ लाख एवढा निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-** राज्याचा कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यासाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीला सन २०१२-१३ साठी रु.१०२८.७५ लाख एवढा निधी मंजूर करण्यास या शासन निर्णयाद्वारे मंजूरी देण्यात येत आहे.

२. उपरोक्त रु.१०२८.७५ लाख निधी खालील उद्दिष्टांसाठी अर्थसंकल्पित करण्यांत आलेला आहे.

**क) कार्यालयासाठी आवश्यक जागा :-**

महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीसाठी कायम स्वरुपी जागाउपलब्ध होईपर्यंत तात्पुरती सोय म्हणून अंदाजे किमान ५००० चौ. फुट जागा मुंबई शहराच्या मध्यवर्ती ठीकाणी भाडेतत्वावर उपलब्ध करुन घेण्यासाठी अंदाजे रुपये १५०.०० लाख.

**ख) कार्यालयीन फर्निचर व साधन सामुग्री :-**

सोसायटीच्या कार्यालयात कार्यालयीन फर्निचर व साधनसामुग्रीसाठी रुपये १४८.६० लाख.

**ग) आवश्यक मनुष्यबळ:-**

अ) माहीती तंत्रज्ञान विभागाने निवड केलेल्या तज्ञ सल्लागारांच्या एका एजन्सीची निवड करुन सदर विभागाने ठरविलेल्या प्रति मनुष्य महिन्याच्या दराप्रमाणे १ वरीष्ठ सल्लागार व १ सल्लागार यांची नियुक्ती कंत्राटी पद्धतीने घेण्याचे प्रस्तावित असुन त्यासाठी रुपये ३९.६० लाख निधी.

ब) MBA ची पदवी व २ ते ५ वर्षाचा प्रकल्प व्यवस्थापन किंवा कौशल्य विकास व्यवस्थापनाशी निगडीत अनुभव असणारे किमान ८ Skill Mission Officer व त्यांच्यावर पर्यवेक्षणासाठी तसेच शासनाच्या वेगवेगळया विभागांशी समन्वय साधण्यासाठी अखिल भारतीय किंवा राज्य सेवेतील गट अ वरीष्ठ (अतिरीक्त जिल्हाधिकारी स्तराचा) दर्जाच्या अधिका-याची प्रतिनियुक्तीने किंवा सरळ सेवेने एक Mission Coordinator ची नियुक्ती करणे. सदर Skill Mission Officer हे शासनाचे मुख्य विभाग व जिल्ह्यांचे कौशल्य विकास कार्यक्रमा संबंधी समन्वय व मार्गदर्शन करतील. त्याशिवाय कार्यालयीन कामकाजासाठी MBA Finance पदवी धारण केलेला १ वित्त अधिकारी, पदवी व कार्यालयीन प्रबंधन पदवीका धारण केलेला १ कार्यालयीन अधिक्षक व पदवी धारण केलेले ३ सहाय्यक यांची नियुक्ती करणे. वरील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांची सेवा ५ वर्षासाठी कंत्राटी पद्धतीने उपलब्ध करुन घेण्यांत याव्यात. तसेच दरवर्षीच्या मुल्यमापनाच्या आधारावर त्यांचे नियुक्ती पुढे सुरु ठेवण्याचे निर्णय घेण्यांत येतील यासाठी एकुण रुपये ८८.८० लाख निधी.

क) सदर कार्यालयाच्या गृहव्यवस्थापनासाठी (House Keeping) ४ कर्मचाऱ्यांची सेवा कंत्राटी पद्धतीने योग्य एजन्सीकडून प्राप्त करुन घेण्यांत येईल व त्यासाठी दरवर्षी रुपये ६.०० लाख निधी.

**घ) राज्यस्तरीय Skill Gap Assessment Study:-**

राज्य स्तरावरची कार्यवाही पुर्ण करण्यासाठी प्रति जिल्हा १०.०० लाख या प्रमाणे एकुण रुपये ३५०.०० लाख निधी.

**च) इतर आनुषंगीक खर्च रु.२२५.०० लाख:-**

१. कार्यालयीन खर्च रुपये १००.०० लाख,
२. प्रवास खर्च रुपये रुपये १००.०० लाख,
३. दुरध्वनी खर्च रुपये ५.०० लाख,
४. विज व पाणी इ. खर्च रुपये १०.०० लाख,
५. कार्यालयीन कामासाठी खाजगी वाहन भाडयांनी घेणे रुपये १०.०० लाख.

छ) **यशदा, पुणे येथे ज्ञान व्यवस्थापन केंद्र स्थापन करणे:-**

सदर ज्ञान केंद्रासाठी कंत्राटी पध्दतीने अधिकारी व कर्मचारी नियुक्ती करण्यासाठी आवर्ती स्वरुपात रु.१२.७५ लाख व कार्यालयीन इ. खर्च यासाठी अनावर्ती रु.८.०० लाख असा एकुण रु.२०.७५ लाख निधी.

३. वरील प्रयोजनार्थ अर्थसंकल्पित झालेल्या रु.१०,२८,७५,०००/- निधीपैकी वित्त विभागाने ८०% च्या मर्यादेत रु.८,२३,००,०००/- एवढा निधी वितरणास व खर्चास मुक्त केला असून तेवढा निधी खर्चासाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. या निधीमधून विहित पध्दतीचा अवलंब करुन खर्च करण्यात यावा. यशदा, पुणे येथे "ज्ञान व्यवस्थापन केंद्र" स्थापन करावयाच्या प्रस्तावास शासनाची विहित मान्यता प्राप्त झाल्यावर त्यावरील खर्च करण्यात यावा.

४. या प्रस्तावा अंतर्गतचा खर्च "डब्ल्यु-४, २२३०-कामगार व सेवायोजन, ०३-प्रशिक्षण, १९९-अशासकीय संस्थांना सहाय्य, (०१)कौशल्य विकास कार्यक्रम, (०१)(०१)कौशल्य विकासासाठी राज्य व्यवस्थापन समिती (२२३० ५८५५), ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशिर्षाखाली सन २०१२-१३ या आर्थिक वर्षामधील मंजूर करण्यात यावा.

५. या योजनेच्या राज्यस्तरावरील समन्वय व सनियंत्रणाची जबाबदारी आयुक्त, रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास यांची राहील. तसेच ह्या संदर्भातील आहरण व संवितरण अधिकारी म्हणून आयुक्त, रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य हे राहतील.

६. सदरचा शासन निर्णय नियोजन विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्रमांक ३३२/२०१२/व्यय-५, दिनांक १५/०५/२०१२ व वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्रमांक २१९/अर्थ-८, दिनांक ०२/०६/२०१२ च्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. हा शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यांत आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१२०६०६०३१३५२४०२ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(गो.जो.रसाळ)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति
मा. मुख्य मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक.
आयुक्त, रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास, मुंबई.
संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
महालेखापाल (लेखा परीक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
कार्यासन व्यशि-१,२,३,४.
निवड नस्ती (व्यशि-५) ५ प्रती.